# रेल्वेने घेतलेल्या जमिनीचा भीमनगर दरेतील शेतकऱ्यांना मोबदला द्या!

## ३५ कुटुंबांना घेऊन उपोषण करणार, रमेश उबाळे यांचा थेट मुख्यमंत्र्यांना इशारा

**कोरेगाव : प्रतिनिधी**

कोरेगाव तालुक्यातील भीमनगर- दरे गावातील पुणे-मिरज रेल्वे लाईनमध्ये गेलेली जमीनीचा मोबदला येत्या १५ दिवसात न दिल्यास या गावातील पस्तीस कुटूंबियांना घेऊन आपण जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसणार असल्याचा इशारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस सामजिक न्याय विभागाचे जिल्ह्याध्यक्ष रमेश उबाळे यांनी मुख्यमंत्र्यांकडे पाठविलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, नवीन पुणे-मिरज रेल्वे लाईनचे सध्या काम सुरू आहे. त्यामध्ये भीमनगर दरे गावातील ३५ खातेदारांच्या शासनाकडून मिळालेल्या पुनर्वसीत शेत जमिनी सदर रेल्वे लाईनमध्ये गेलेल्या आहेत. यामध्ये या दोन्ही गावाला साधी स्मशानभूमीही राहिली नाही. भीमनगर स्मशानभूमीची १३ तर दरे गावची १७ अशी एकूण मिळून ३० गुंठे जमीन रेल्वे लाईनमध्ये गेली आहे. येथील ग्रामस्थ, शेतकऱ्यांना याचा मोबदला मिळाला नाही. मुळात पुनर्वसीत वसलेले गाव शासनाने दिलेली शेतजमीन एकदा सोडून दोनदा रेल्वेने घेतली आहे. पुनर्वसित शेत-जमीन कशी घेऊ शकते? असा आपला शासनाला सवाल आहे. भीमनगरमधील माझ्या दलित बांधवांवर अन्याय झाला आहे.त्यांना न्याय मिळाला पाहिजे. भीमनगर-दरे ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुनर्वसीत गाव आहे. घेतलेल्या जमिनीच्या मोबदल्यात दुसरी जमीन अथवा आर्थिक रूपाने नुकसानभरपाई मिळावी अशी आपली मागणी आहे. माझ्या मागासवर्गीय बांधवांना आपण येत्या १५ दिवसात न्याय मिळवून द्यावा अन्यथा आपण जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अन्यायग्रस्त कुटूंबियांना घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करणार आहे.



### मुख्यमंत्री साहेब तुम्ही मनावर घ्या तुमच्या गावचा विषय आहे...

**पुनर्वसीत भीमनगर-दरे हे गाव मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांचे गाव आहे. मुख्यमंत्री शिंदे यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेशी अतिशय सलोख्याचे संबंध आहेत हे आम्ही टीव्हीवर पाहिले आहे त्यामुळे मुख्यमंत्री साहेबांनी मनावर घेऊन प्राधान्याने लक्ष घालून रेल्वे खत्याशी पत्रव्यवहार केल्यास या गावाना ताबडतोब जमिनीचा मोबदला मिळू शकतो असेही रमेश उबाळे यावेळी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हणाले.**

# वाघळवाडीच्या ग्रामस्थांनी ठरवलं दारूबंदी करायची...

## गावाच्या विकासांचे विविध ठराव घेत ग्रामसभा संपन्न

**बारामती : प्रतिनिधी**

वाघळवाडी ग्रामपंचायतीची ग्रामसभा सरपंच अँड. हेमंत गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. वाघळवाडी गावातील महिलांनी आणि ग्रामस्थांनी ग्रामसभेत मांडलेल्या विषयास सर्वानी एकमताने मंजुरी देत अवैद्यरित्या विक्री केली जाणाऱ्या दारू बंदीचा ठराव घेण्यात आला. गावात शुद्ध पाणी मिळण्यासाठी जल जिवन मिशन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजने संदर्भात सर्व समावेशक चर्चा पार पडली. विरोधी पक्षनेते अजित दादा पवार यांच्या मार्गदर्शनाने राबवण्यात येणाऱ्या या महत्वपूर्ण अश्या योजनेतून संपूर्ण गावाला शुद्ध पाणी मिळणार असून २२ कोटी इतक्या निधीतून योजना राबविण्यात येणार आहे.

तसेच विविध ग्रामविकास समित्यांचे पुनर्गठन करण्यात आले, १००% घरपट्टी व पाणी पट्टी वसूल करणे या साठी नागरिकांनी सहकार्य करणे आवश्यक आहे, अंत्यविधीच्या जागेच्या ठिकाणी उपाययोजना व सुधारणा करणे अश्या विषयांवर चर्चा करत ठराव घेण्यात आले.

गावातील मुलांना, ग्रामस्थांना निवांतपणे वेळ व्यतिथ करता यावा या करिता वनउद्यान उभारण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. यावेळी या ठिकाणी पर्यावरण समतोल राखुन वनउद्यान साकारण्यात यावे असे सर्वानमते ठरविण्यात आले.

गावातील शेतकऱ्यांना ये-जा करण्यासाठी असलेले अनेक वर्षापासून बंद झालेले रस्ते तसेच ओढे खुले करण्याबाबत संबंधित शेतकऱ्यांशी बोलून तसेच यावर मार्ग खुले करण्यासाठी प्रशासनाकडे मदतीची मागणी करण्याचे ठरले. तसेच निरा डावा कालव्यावर घाडगे वस्ती नजीक रहदारी साठी पूल करण्यात यावा असे शेतकऱ्यांच्या दृष्टीने सुद्धा निर्णय घेण्यात आले.

गावांतील आजी-माजी सैनिक यांना करमाफी देण्याबाबत अनेक दिवसांपासून मागणी होत होती. परंतु त्या संदर्भात निर्णय घेण्यात आला नव्हता. यावर या ग्रामसभेत सैनिकांच्या मिळकतीच्या करमाफी करण्याचा ठराव करून ऐतिहसिक निर्णय घेण्यात आला. गावच्या दृष्टीने विकासासाठी पूरक असलेले विविध विषयांवर उपस्थित ग्रामस्थांनी खुलेपणाने चर्चेत सहभागी घेत सर्व विषयांना मंजुरी देत ग्रामसभा पार पडली. या वेळी ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य, उपसरपंच ,ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते.

# शिवजयंती सोहळ्याचे पालकमंत्री सावंत यांना निमंत्रण





**उस्मानाबाद : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९३ व्या जयंतीनिमित्त मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती धाराशिव (उस्मानाबाद) सन २०२३ आयोजित विविध कार्यक्रमाची प्रा. डॉ. तानाजीराव सावंत सार्वजनिक आरोग्य मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री सावंत यांना निमंत्रण पत्रिका देण्यात आली यावेळी विश्वास आप्पा शिंदे , सुरज साळुंके, सिद्धार्थ बनसोडे तसेच मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष धनंजय राऊत उपस्थित होते.

# आरडगाव येथे विविध विकासकामांचे उद्घाटन

**लोणंद : प्रतिनिधी**

फलटण तालुक्यातील आरडगाव येथे जलस्वराज्य अंतर्गत एक लाख लीटर्सच्या पिण्याच्या पाण्याचे टाकीचे भूमिपूजन व अंगणवाडी कंपाऊंडचे भूमीपूजन जि.प. अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर, आ. दिपक चव्हाण, हिंगणगाव जिल्हा परिषद सदस्य धैर्यशील अनपट यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना अनपट म्हणाले, फलटण तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार रामराजे नाईक निंबाळकर यांच्या सहकार्यामुळे व मार्गदर्शनाने संजीवराजे, आ. दिपक चव्हाण व आम्ही सर्वजण काम करत आहोत. ऊस दराचा प्रश्न असो, दूध दराचा प्रश्न असो, बचत गटांचे प्रश्न असो, रस्त्यांचे प्रश्न असो, पिण्याच्या पाण्याची प्रश्न असो रोजगाराचे प्रश्न असो अशा सर्व प्रश्नांची सोडवणूक महाराज, संजीवराजे व आ. दीपक चव्हाण यांच्या माध्यमातून होत आहेत.

आमदार चव्हाण म्हणाले, आरडगांवामधील सिमेंट रस्ते, पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न भविष्यात उद्भवू नये म्हणून महाराज साहेबांच्या प्रयत्नामुळे जलस्वराज्य अंतर्गत केंद्र व राज्य सरकारच्या मदतीने तांबवे धरणातून पाईपलाईन करून एक लाख लिटर क्षमतेची भली मोठी टाकी बांधून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटवला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. विजेचे चार डीपी मंजूर झाल्याचेही



त्यांनी आवर्जून सांगितले. बौद्ध वस्तीतील सभा मंडपाचे काम लवकरात लवकर पूर्ण केले जाईल याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. गावातील ग्रामपंचायत ते दत्त मंदिर राहिलेल्या सिमेंटच्या रस्त्याचे काम ही लवकरात लवकर पूर्णत्वास नेण्याची ग्वाही त्यांनी दिली.

संजीवराजे बोलताना म्हणाले, आजवर गावाने आमची सोबत सोडली नाही. गावातील सर्व प्रश्नांची सोडवणूक केलेली आहे. उर्वरित अपूर्ण कामेही लवकरात लवकर पूर्णत्वास नेण्यास आम्ही कटिबद्ध असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले .सध्या तालुक्यामध्ये कोणते काम केले तरी आम्हीच केले असे सांगितले जात असून युवकांची दिशाभूल केली जात आहे ,अशी दिशाभूल करणाऱ्या लोकांच्या पाठीमागे युवकांनी जाऊ नये असे आवर्जून कोणाचेही नाव न घेता विरोधकांना त्यांनी टोला लगावला. वैयक्तिक कोणाचेही काही काम असेल तर स्वतः आमच्याकडे या, त्यासाठी कोणाला घेऊन येण्याची गरज नाही. तुमचे काम होण्यासारखे असेल तर तत्पर केले जाईल असेही आव्हान संजीवराजे यांनी यावेळी केले.

यावेळी आरडगांवचे सरपंच रवि शिर्के, सामाजिक कार्यकर्ते पराग भोईटे, विक्रांत भोईटे, ग्रामसेवक सोनवलकर, पोलिस पाटील अमित भोईटे, शैलेश भोईटे, वरुण भोईटे,शशिकांत भोईटे, विशुभोईटे, हेमंत भोईटे,विजय भोईटे, सुनिल भोईटे, ऊद्धव भोईटे, महेश धुमाळ, सचिन भोईटे, छगणकाटे, आदी मान्यवर ऊपस्थित होते.

# क्लासमध्ये कोयता आणणाऱ्या त्या सहा विद्यार्थ्यांवर गुन्हा

**सातारा : प्रतिनिधी**

क्लासमध्ये कोयता आणणाऱ्या त्या सहा विद्यार्थ्यांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक एक फेब्रुवारी रोजी साडेपाच वाजण्याच्या सुमारास अंशुल श्रेयस कोदे रा. सदर बाजार, सातारा याला घाबरवण्यासाठी पार्थ सचिन निकम रा. सदर बाजार सातारा, रिहान सलाउद्दीन मुल्ला रा. शाहूनगर गोडोली सातारा, गौरव विलास नांगरे राहणार गोळीबार मैदान सातारा, यश किरण जगदाळे राहणार पीरवाडी सातारा, सार्थक उमेश खंडझोडे राहणार मंगळवार पेठ सातारा आणि आयांश समीर शेख राहणार सैदापूर सातारा यांनी आपापसात कट करून क्लासमध्ये कोयता आणून अंशुल कोदे याला क्लासच्या पाठीमागे बोलावून घेऊन कोयता बेंचवर आपटून घाबरवले. या प्रकरणी सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून अधिक तपास महिला पोलीस उपनिरीक्षक मुसळे करीत आहेत.

# राज्यात आदर्शवत ठरतील असे स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र व आदर्श शाळा तयार करा : पालकमंत्री देसाई

**सातारा : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी यासाठी स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र अभियान राबविण्यात येत आहे. तसेच जिल्हा परिषदेतील शाळेतील विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळावे म्हणून आदर्श शाळा निर्मिती उपक्रम राबविण्यात येत आहे. हे स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र व आदर्श शाळा राज्यातील इतर जिल्ह्यांना आदर्शवत ठरतील असे तयार करा, अशा सूचना राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिल्या.




जिल्हा परिषदेमधील सभागृहात पालकमंत्री श्री. देसाई यांनी स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र अभियान व आदर्श शाळा निर्मितीबाबत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. या बैठकीला जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी, मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी, पोलीस अधीक्षक समीर शेख, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले, जिल्हा नियोजन अधिकारी शशिकांत माळी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुभाष चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. वैशाली बडदे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शबनम मुजावर आदी उपस्थित होते.

सार्वजनिक आरोग्य सेवेचा दर्जा उंचावला तर ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळेल यासाठी स्मार्ट प्राथमिक आरोग्य अभियान योजना राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत सतरा प्राथमिक आरोग्य केंद्रांची निवड करण्यात आली आहे. येत्या जून पर्यंत दहा स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्रे तयार करा, अशा सूचनाही पालकमंत्री श्री. देसाई यांनी दिल्या.

जिल्ह्यातील सतरा प्राथमिक आरोग्य केंद्रे स्मार्ट करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून देण्यात आलेल्या निधीचा वापर करावा, अशा सूचना करुन पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र अभियानातील कामे ही दर्जेदार होण्यासाठी अधिकाऱ्यांची नेमणुक करावी. निधी कमी पडत असल्यास आणखीन निधी दिला जाईल.

स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये सोलर एजर्जी, रेन वॉटर हार्वेस्टिंग, आयुष हर्बल गार्डन याच्या निर्मितीबरोबर या अभियानासाठी जिल्हा नियोजन, जिल्हा परिषद स्वनिधी, सीएसआर, राष्ट्रीय आरोग्य अभियान यासह विविध योजनांचा निधीचा वापर करुन ग्रामीण भागातील नागरिकांना जास्तीत जास्त चांगल्या आरोग्य सुविधा कशा उपलब्ध होतील यासाठी प्रयत्न करावा, असेही पालकमंत्री श्री. देसाई यांनी सांगितले.

# रेशनिंग दुकानदार केरोसिन परवानाधारक संघटनेचे जिल्हा प्रशासनाला निवेदन

## ७ ते ९ फेब्रुवारी पॉज मशिन बंद आंदोलनाचा इशारा

**सातारा : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील रास्त भाव धान्य दुकानदार व केरोसिन परवानाधारक संघटनेच्या वतीने दि ७ ते ९ फेब्रुवारी दरम्यान पॉज मशिन बंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. ऑन लाईन सर्वरचा सततचा बिघाड ही मूळ तक्रार असल्याचे सांगत संघटना अध्यक्ष श्रीकांत शेटे यांच्या अध्यक्षतेखाली शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेत त्यांना निवेदन सादर केले.

आज रोजी सातारा जिल्हा रास्तभाव धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक संघटना, सातारा यांच्या वतीने दुकानदारांना येणाऱ्या अडचणी व समस्यांबाबत



मा. रुचेश जयवंशी- जिल्हाधिकारी साहेब, मा. जीवन गलांडे- अपर जिल्हाधिकारी साहेब, मा. अमर रसाळ- सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी साहेब, जिल्हाधिकारी कार्यालय सातारा. मा. दयानंद कोळेकर- निवासी नायब तहसीलदार साहेब, सातारा यांना समक्ष भेटून निवेदन देण्यात आले.

सदरचे निवेदन संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत शेटे यांचे नेतृत्वाखाली देण्यात आले. याप्रसंगी सातारा जिल्ह्यातील तालुक्यांचे तालुका अध्यक्ष उपस्थित होते. अजित कासुर्डे- महाबळेश्वर, राजेंद्र भिलारे- जावली, तुकाराम भादुले- खटाव, राजेंद्र भोईटे- कोरेगाव, मधुकर पवार- खंडाळा, आप्पासाहेब तोडकरी- खंडाळा, सातारा तालुका उपाध्यक्ष- बबनराव देवरे, उपाध्यक्ष- संजय रजपूत, सातारा तालुक्यातील इतर पदाधिकारी, रेशन दुकानदार बंधु - भगिनी उपस्थित होते.

ऑन लाईन सर्वरमध्ये बिघाड, दुकानदारांच्या तक्रारीची एनआयसी ने न घेतलेली दखल, त्यामुळे दुकानदार व खातेदार यांच्यात होणारे वादाचे प्रसंग अन्न सुरक्षा योजनेचे एक वर्षाचे प्रलंबित कमिशन दुकानदारांच्या दैनंदिन खर्चाची अडचण इं तक्रारींकडे श्रीकांत शेटे यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. या मागण्यांचा गांभीर्याने विचार न झाल्यास ७ ते ९ फेब्रुवारी पॉझ मशिन बंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

# अन्य राज्यांप्रमाणे महाराष्ट्रात जातनिहाय जनगणना करा

## अ. भा. माळी महासंघाची मागणी

**फलटण : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात जातनिहाय जनगणना करण्याची मागणी अखिल भारतीय माळी महासंघ गेल्या ३३ वर्षांपासून करीत असल्याचे निदर्शनास आणून देत आता त्याबाबत निर्णय न केल्यास जनतेतून मोठा उद्रेक होईल, ओबीसी समाज जात निहाय जनगणनेस विरोध करणाऱ्या राजकीय पक्षांना मतदान करणार नसल्याचे अखिल भारतीय माळी महासंघाचे अध्यक्ष शंकरराव लिंगे यांनी स्पष्ट केले आहे.

जातनिहाय जनगणनेच्या मागणी बाबत माहिती देण्यासाठी आणि अ. भा. माळी महासंघ त्याबाबत जनजागृतीसाठी करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल, अन्य राज्यातील सद्य स्थितीबाबत माहिती देण्यासाठी येथील शासकीय विश्राम गृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत शंकरराव लिंगे बोलत होते. यावेळी डॉ. बी. के. यादव, बापूराव काशीद, बबलू मोमीन, अमीरभाई शेख उपस्थित होते.

जनगणना हा केंद्र शासनाशी संबंधीत विषय आहे, तथापि जातनिहाय जनगणना करण्यास केंद्र शासनाने असमर्थता व्यक्त केली असल्याने महाराष्ट्र शासनाने बिहार शासनाप्रमाणे जातनिहाय जनगणना करावी अशी मागणी करताना तसा ठराव दि. ९ जानेवारी २०२० रोजी तत्कालीन महाराष्ट्र विधानसभा सभापती नाना पटोले यांनी विधानसभेत मांडला असता सर्व पक्षांनी पाठिंबा देत सदर ठराव महाराष्ट्र विधान सभेत एकमताने मंजूर झाल्याचे निदर्शनास आणून देत त्याची अंमलबजावणी राज्यातील शिंदे - फडणवीस सरकारने त्वरीत करावी अशी आग्रही मागणी शंकरराव लिंगे यांनी पत्रकार परिषदेत केली.

बिहारमध्ये जातनिहाय जनगणना सुरु झाली आहे. राज्यस्थान, कर्नाटकने जात निहाय जनगणना केली आहे. छत्तीसगड, ओरीसा, तामिळनाडू मध्येही जात निहाय जनगणना होणार असल्याचे निदर्शनास आणून देत त्यांच्या या निर्णयाचा राज्याच्या विकासासाठी उपयोग होणार असल्याचे शंकरराव लिंगे यांनी सांगितले.



**जातनिहाय जनगणनेबाबत पत्रकार परिषदेत माहिती देताना शंकरराव लिंगे, डॉ. बी. के. यादव, बापूराव काशीद.**

दि. ५ मे २०१० रोजी संसदेत राष्ट्रवादीचे नाशिकचे तत्कालीन संसद सदस्य समीर भुजबळ, स्व. गोपीनाथराव मुंडे, लालूप्रसाद यादव, मुलायमसिंह यादव, शरद यादव यांचेसह १०० खासदारांनी ओबीसी जनगणनेचा ठराव मंजूर करुन घेतला त्यामुळे २०११ ते २०१४ मध्ये केंद्राने सामाजिक व आर्थिक जातनिहाय गणना केली, मात्र त्याची आकडेवारी जाहीर केली नसल्याचे शंकरराव लिंगे यांनी निदर्शनास आणून दिले.

जातनिहाय जनगणना करुन ९० वर्षे पूर्ण झाली आहेत. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने फक्त अनुसुचित जाती व जमाती यांची जातनिहाय तर इतर सर्वांची एकत्रित गणना करण्याचे धोरण स्विकारले. यातुन मागासवर्गीय, ओबीसी वंचित राहिले. सन १९९४ साली केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने ओबीसी जनगणना कशी आवश्यक आहे ते सरकारला तिसऱ्यांदा पटवून दिल्याचे निदर्शनास आणून देत त्यानंतर २०१७ साली देशाचे तत्कालीन गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी २०२१ ची राष्ट्रीय जनगणना जातनिहाय करण्याचे आश्वासन लोकसभेत दिले होते. देशात सन २०२१ च्या नियमित जनगनणेचे काम अद्याप व्हायचे असल्याने सदर जनगणना आता होणार असून त्यामध्ये जातनिहाय जनगणना करावी अशी आमची सातत्याने मागणी आहे. कारण त्यासाठी वेगळा खर्च करण्याची आवश्यकता नाही, केवळ त्यामध्ये एक कॉलम वाढवून नियमीत जनगणने बरोबर जातनिहाय जनगणना शक्य होणार असल्याचे शंकरराव लिंगे यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

महाराष्ट्रात जातनिहाय जनगणना व्हावी यासाठी सर्व ओबीसी संघटनेच्या माध्यमातून गावागावात माहिती देवून निवेदने तयार करुन ती तसीलदार व जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविली जात असल्याचे निदर्शनास आणून देत जनजागृती बरोबर या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी धरणे आंदोलन, उपोषण या मार्गाने काम सुरु असल्याचे शंकरराव लिंगे यांनी सांगितले.

प्रारंभी डॉ. बी. के. यादव यांनी स्वागत केल्यानंतर जतनिहाय जनगणनेची आवश्यकता, त्यातून मिळणारे फायदे याविषयी सविस्तर विवेचन केले. बापूराव काशीद यांनी समारोप व आभार प्रदर्शन केले.

# कृषी विभागाचं आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य जनजागृती अभियान उत्साहात




**वडूज : प्रतिनिधी**

तालुका कृषी कार्यालयाच्या वतीने आंतरराष्ट्रीय पौष्टीक तृणधान्य वर्ष २०२३जन जागृती अभियान वरुड येथे आयोजित करण्यात आलं.कृषी कर्मचारी व ग्रामस्थांच्या वतीने गावातून जनजागृती फेरी घोषणा देत काढण्यात आली.

नाचणीमध्ये आहे सर्वात जास्त कॅल्शियम, राहतील हाडे मजबूत तर काय करेल यम?, पौष्टिक तृणधान्य आहे पोषक घटकांची तिजोरी, शरीरात येणार नाही कोणत्याही घटकाची कमजोरी, शेत तिथे पौष्टिक तृणधान्य शेती, राही आरोग्याची चावी हाती, तृणधान्य खाण्यास नका करु आळस, साधाल सुखी आरोग्याचा कळस, अन्नधान्य म्हणून घ्याल तृणधान्याची रास, मिळेल आरोग्याची हमी हमखास, उतरंड आहे तृणधान्याची, प्रगती साधेल आरोग्याची, नाचणीत आहे जिवनसत्व 'ब' चे प्रमाण जास्त, साखर नाही होणार, रहा बिनधास्त, खात रहा राजगिरा, त्याने होईल बळकट शरीराच्या शीरा, बाजरीची भाकरी खाल्ली, अंगातली साखर नरमली, पौष्टिक तृणधान्याची आहे ख्याती, आरोग्य हिच खरी संपत्ती, भगरीमध्ये आहे प्रथिन्यांचे प्रमाण सर्वात मस्त, शरीर राहते आपले तंदुरुस्त, तृणधान्य आहेत सर्वात भारी, नाही जावे लागणार दवाखान्याच्या दारी, नाही खाणार ज्वारी, तर जाल हृदयविकाराच्या आहारी, अशा प्रकारच्या घोषणा यावेळी देण्यात आल्या.

कार्यक्रमात कृषी विभागाचे अधिकारी यु.एम. तिकुटे, आर. के. शिंदे यांनी मार्गदर्शन केले. जी. बी. सपकाळ यांनी आभार मानले. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.